जा.क्र.मसंके/भासुयो/६६३/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली. जि. रत्नागिरी.
**दिनांक :** ०१.०३.२०२३

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

**विषयः— घडीपत्रिका छपाईसाठी दरपत्रक देणेबाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरून मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत भाजीपाला सुधार योजना कार्यालयातील घडीपत्रिका छपाई करण्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | ४ पानी २१.५ X २८सेमी |
|---|---|---|
| १. | आर्टप्लेट छपाई (१३०जीएसएम) सिनारमास पेपर | एकूण १४ घडीपत्रिका प्रत्येकी ५०० नग छपाई |

वरील घडीपत्रिका छपाई**चे** दरपत्रक बंद लखोटयात मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली ता. दापोली जि. रत्नागिरी यांचे नावे कार्यालयात दिनांक २०/०३/२०२३ पर्यत पोहचेल असे पाठवावे.

**उपरोक्त तपशिलातील अटी व शर्ती खालीलप्रमाणेः**

१. दरपत्रक देताना लखोटयावर **'भाजीपाला सुधार योजना, घडीपत्रिका छपाई करण्यासाठीचे दरपत्रक'** असे स्पष्ट नमुद करावे. दिनांक २०/०३/२०२३ नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रकावर जी.एस.टी. क्रमांक नमुद करावा. जी.एस.टी. लागू होत नसल्यास तसे प्रमाणपत्र सादर करावे तसेच पॅनकार्डची छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक राहील.
३. सदर घडीपत्रिका छपाई मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली भाजीपाला सुधार योजना येथे विहित मुदतीत कार्यालयास पोहोच करणे आवश्यक आहे.
४. वरील घडीपत्रिका छपाई करणेबाबतचे एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा/रद्द करण्याचा तसेच खरेदी संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवीत आहेत.
५. वरील घडीपत्रिका छपाई देयकामध्ये बँक खात्याची छायांकित प्रत, पॅनकार्ड, आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. देयकाची अदायगी रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २१/०३/२०२३ रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.
७. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाण पत्र जोडावे. अधिकृत दरसूची जोडावी.
९. दरपत्रकामध्ये संबंधीत सर्व करांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

**भाजीपाला विशेषज्ञ,**
भाजीपाला सुधार योजना,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली